दु.क्र. ०२०-२४४७६९३८

Email
sqaafmh@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे४११०३०.

जा.क्र. राशैसंप्रपम/मूल्यमापन/SQAAF/२०२५/००५८२ दि ०३/०२/२०२५

प्रति,

संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे
सहसंचालक/ उपसंचालक, शिक्षण विभाग (सर्व)
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)

विषय: शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) बाबतची माहिती सोबत दिलेल्या लिंकमध्ये भरणे बाबत...

संदर्भ: १. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि. १५ मार्च,२०२४ (SQAAF)
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६ मंत्रालय मुंबई दि. १५ मार्च,२०२४ (SSSA)
३. मा. संचालक सो. SCERT PUNE यांचेकडील मान्य टिपण्णी दि. ०८/०१/२०२५

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे येथे राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ नुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची (SQAAF) निर्मिती करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.३ नुसार सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयं-मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या maa.ac.in या वेबसाईटवरील SQAAF टॅबवर https://scert-data.web.app/ या नावाने स्वयं-मूल्यांकनासाठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तरी, सदरील ऑनलाईन लिंकवर माहिती भरणे बाबत आपल्या जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे. तसेच, सदरील लिंक ही दि.२८ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायं. ०५:०० पर्यत भरण्याची कार्यवाही करावी. सदरील लिंकमध्ये माहिती भरण्याची कार्यवाही खाली दिलेल्या सूचनानुसार विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

१. सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी विकसित करण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मुल्याकन आणि आश्वासन आराखड्याची (SQAAF) प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी

प्राचार्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची असेल.

२. संकेतस्थळावर सर्व शाळांची नोंदणी व स्वयं-मुल्यांकन करून घेण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांच्या व माध्यमिक शाळांच्या संदर्भात अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

३. शाळांना मुल्यांकनासंदर्भात तसेच शाळा विकास आराखडा निर्मिती संदर्भात गरजेनुसार मार्गदर्शन करण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था यांची असेल.

४. माहिती भरणे बाबत सर्व मुख्याध्यापक यांना सोबत दिलेल्या सूचना पत्राचे अवलोकन करून माहिती भरणे बाबत कळविण्यात यावे.

५. SQAAF बाबत मार्गदर्शनपर व्हिडीओ SCERT, PUNE यांच्या SQAAF टॅबमधील SQAAF-व्हिडीओ या सबटॅबवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. माहिती भरण्यापूर्वी सर्व मार्गदर्शनपर व्हिडीओ पाहण्यासाठी सूचित करावे.

६. SQAAF बाबत शासन निर्णय SCERT, PUNE यांच्या SQAAF टॅबमधील SQAAF- शासन निर्णय या सबटॅबवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. माहिती भरण्यापूर्वी सर्व शासन निर्णयाचे अवलोकन करणेविषयी सूचित करावे.

७. मुल्यांकनासंदर्भात काही तक्रार असल्यास किंवा SQAAF लिंक भरणे बाबत काही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास sqaafmh@maa.ac.in या ई-मेल आयडीवर शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचे मार्फत कळविण्यात यावे.

८. जिल्ह्यातील सर्व शाळांचे स्वयं-मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर बाह्य-मूल्यांकन व त्रयस्थ संस्थेद्वारे मूल्यांकन केले जाणार आहे. तरी, सर्व शाळांना स्वयं-मूल्यांकन करताना वस्तूस्थितीदर्शक माहिती भरणेबाबत कळविण्यात यावे. अवास्तव स्वयं-मूल्यांकन होणार नाही याची खबरदारी संबधित मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती/ शाळा व्यवस्थापन व विकास समिती यांना घेणेविषयी कळविण्यात यावे.

९. स्वयं-मूल्यांकनानंतर यथास्थिती बाह्य-मूल्यांकन व त्रयस्थ संस्थेद्वारे मूल्यांकन केले जाणार आहे.

१०.स्वय-मूल्यांकनानंतर यथास्थिती बाह्य-मूल्यांकनात व त्रयस्थ पक्षाद्वारे केले जाणारे मूल्यांकनात १५% हून अधिक तफावत आढळल्यास संबंधित मुख्याध्यापकावर याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

११.बाह्य- मुल्यांकनानंतर ज्या मानकामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. अशा मानकांचा विकास आराखडा तयार करणे शाळांना बंधनकारक राहील व SQAAF पोर्टलवर अपलोड करणेबाबत सूचना प्राप्त होताच अपलोड करणे बंधनकारक राहील.

१२.बाह्य- मुल्यांकनानंतर/त्रयस्थ पक्षाद्वारे केल्या जाणारे मुल्यांकनानंतर मिळालेल्या श्रेणीचा शाळेच्या दर्शनी भागात व शाळेच्या लेटरहेडवर उल्लेख करावा.

Scanned with OKEN Scanner

१३.स्वयं-मूल्यांकन/बाह्य-मूल्यांकन/त्रयस्थ पक्षाद्वारे केले जाणारे मूल्यांकन करताना खालीलप्रमाणे स्तरनिहाय गुणदान करून संबंधित शाळेची श्रेणी निश्चित करण्यात येईल.

| अ.क्र. | प्राप्त गुण | श्रेणी |
|---|---|---|
| १ | ९१ ते १०० टक्के | अ+ |
| २ | ८१ ते ९० टक्के | अ |
| ३ | ७१ ते ८० टक्के | ब+ |
| ४ | ६१ ते ७० टक्के | ब |
| ५ | ५१ ते ६० टक्के | क+ |
| ६ | ५० टक्के पेक्षा कमी | क |

सोबत- SQAAF लिंक बाबत मुख्याध्यापक यांना सर्वसाधारण सूचना पत्र.

(राहूल रेखावार, भा.प्र.से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.आयुक्त (शिक्षण),शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे.

Scanned with OKEN Scanner